डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

# कृषि तंत्र विद्यालय, वरूड (पुसद)

प्राचार्य, कृ.तं.वि.,वरुड — दुरध्वनी क्रमांक ०७२३३–२४६१०५

जा.क्र.प्राचार्य/कृतंवि/मजूर/०४ /२०२५ — दिनांक ०१/०४/२०२५

## निविदा सुचना

विषय :– सन २०२५–२६ करीता कृषि तंत्र विद्यालय, वरूड (पुसद) अंतर्गत प्रक्षेत्रावरील कंत्राटी पध्दतीने करण्याकरीता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडूण निवीदादर बोलवीणे बाबत.

संदर्भ :– मा. कलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचे परिपत्रक क्रमांक जा.क्र./बिइए/आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/५९४ दिनांक २२ जून २०२१

वरील संदर्भीय विषयाच्या अनूषंगाने कळवीण्यात येते कि, कृषि तंत्र विद्यालय, वरूड (पुसद) अंतर्गत प्रक्षेत्रावरील जनावरे चारणे, शेळीसंगोपन, चौकीदारी व बिजोत्पादनासंबधीत कुशल व अकुशल कंत्राटी पध्दतीने करण्याकरीता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडून निवीदादर खालील प्रमाणे अटि व शर्तीस अधीन राहून मागवीण्यात येत असून निवीदा मसूदा/निवीदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आले आहे.

| अ. क्र. | विवरण | अकुशल मजूर/चौकीदार | | कुशल मजूर/चौकीदार | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन प्रती मजूर वेतन रू. | प्रति महिना प्रती मजूर वेतन रू. (३०दिवसासाठी) | प्रति दिन प्रती मजूर वेतन रू. | प्रति महिना प्रती मजूर वेतन रू. (३०दिवसासाठी) | |
| १ | संस्थात्मक शेतीकरीता किमान वेतन | १८०/– | ५४००/– | २४०/– | ७२००/– | |
| २ | सुधारीत विशेष भत्ता (२६ दिवसासाठी ) | १४१.९६/– | ४२५९/– | १४१.९६/– | ४२५९/– | |
| एकूण किमान वेतन (किमान वेतन नियमाप्रमाणे) | | ३२१.९६/– | ९६५९/– | ३८१.९६/– | ११४५८.८/– | |
| ३ | राज्य कामगार विमा (रा.का.वि.म. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (३.२५ टक्के) | १०.४६/– | ३१३.९१/– | १२.४१/– | ३७२.३/– | |
| ४ | कामगार भविष्य निर्वाह निधी कामगाराचे योगदान १३ टक्के | ४१.८५/– | १२५५.६४/– | ४९.६५/– | १४८९.६४/– | |
| | एकूण रक्कम | ३७४.२७/– | ११२२८.५५/– | ४४४.०२/– | १३३२०.७४/– | |
| ५ | सेवाकर रू. | | | | | |
| | | | | | | |

नोट :–

१. निविदा धारकांनी उपरोक्त दर पत्रकामध्ये केवळ सेवा कर नमूद करावे.

२. उपरोक्त नमूद दर हे किमान वेतन कायदयानूसार तसेच वरीष्ठ कार्यालयांनी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकानूसार असून या पेक्षा कमी दर ग्राहय धरण्यात येणार नाही. कंत्राटदारास लागू असल्यास इतर बाबी योग्य स्पस्टीकरण व कागदपत्रासह नमूद करू शकता.

प्राचार्य

अटी व शर्ती

१. निवीदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स्विकारल्या जातील.

२. निवीदा प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, वरूड यांचे नावाने सिलबंद लिफाफ्यात पाठवावी.

३. कंत्राटदाराकडे संबधीत कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबधीत इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयामध्ये सादर करणे बंधनाकारक आहे.

४. निवीदा मधील संबधीत कामे कंत्राटी पध्दतीने करण्याचे दर शासन नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे. तसेच त्या करांचा शासनास विहीत मूदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधीत निवीदा धारकाची राहील. करारासंबधीत कोणतीही तक्रार असल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

५. कंत्राट पध्दतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादनाची कामे, जनावरांची निगा, शेळीपालन, प्रक्षेत्राचे सिंचण सर्व प्रकारची कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरूष मजूरांचे व्यवस्थापणाची संपूर्ण जबाबदारी संबधीत कंत्राटदाराची राहील.

६. कृषि तंत्र विद्यालय, वरूड या विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादनाची कामे करीत असतांना पिकाचे, फळांचे तसेच जनावरांचे संगोपन, शेळीसंगोपन, चौकीदारी संबधीत कामे करीत असतांना नूकसाण झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नूकसाण भरपाई संबधीत कंत्राटदाराकडूण वसूल करण्यात येईल.

७. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कामे तसेच इतर कामे तांत्रीक कामे करते वेळी कुठलीही दूर्घटना/अपघात जिवीतहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी/ किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. यांची सर्वस्वी जबाबदारी संबधीत कंत्राटदाराची राहील.

८. विभागावर देण्यात आलेले बिजोत्पादन कामे तसेच इतर तांत्रीक कामे पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

९. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमाचे पालन करणे संबधीत कंत्राटदारांना बंधनाकारक राहील.

१०. कंत्राटदारांनी देयक सादर करते वेळी बॅक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

११. कंत्राटदारास संबधीत कामाचे देयक काम पूर्ण व विहीत वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबधीत विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणीत केल्यानंतरच कामाचे देयक पारीत करण्यात येइल.

१३. प्रक्षेत्रावरील विभागावर कामे तसेच बिजोत्पादनाचे कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्रि/पुरूष मजूरांना कामगार (लेबर कायदा) कायदयानूसार किमान वेतन/विमासंरक्षण/भवीष्य निर्वाह निधी देणे, कॅशलेस पध्दतीचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे कराचा नियमाने व नियमीत भरणा करणे इ संपूर्ण जबाबादारी संबधीत कंत्राटदाराची राहील.

१४. प्रक्षेत्रावरील विभागावर संबधीत कामे तसेच बिजोत्पादनाची कामे व इतर विभाग संबधीत कामे करीत असतांना कोणताही वादविवाद निर्माण झाल्यास सदर वादविवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. पं.दे.कृ.वि अकोला यांचे समक्ष मिटवीला जाईल व अंतीम निर्णय मा. सहयोगी अधिष्ठाता, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधकारक राहील.

१५. प्रक्षेत्रावरील विभागवार बिजोत्पादनाची कामे तसेच इतर विभाग संबधीत तांत्रीक कामे ही १२ महिण्यातील खरीप, रबी व उन्हाळी या तिनही हंगामाकरीता असून कामाचे दर १२ महीण्याकरीता वैध राहतील. तसेच १२ महिणे काम केले म्हणून स्थायी बाबतचा दावा करता येणार नाही.

१६. कृषि तंत्र विद्यालय, वरूड या विभागावर बिजोत्पादन संबधीत कामे तसेच इतर तांत्रीक कामे करण्यासाठी पुरवीण्यात आलेले कंत्राटी मजूर हे शासनानी दिलेल्या वय मर्यादेत असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरीक दृष्टया सक्षम असावेत.

१७. बिजोत्पादन संबधीत कामे तसेच इतर तांत्रीक कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्रि/पुरूष मजूराचे व्यवस्थापणाची संपूर्ण जबाबदारी संबधीत कंत्राटदाराची राहील.

१८. कृषि तंत्र विद्यालय, वरूड या कार्यालयाअंतर्गत विवीध कामे तसेच तांत्रीक कामे करण्यासाठी पुरवीण्यात आलेल्या कंत्राटी मजूराकडे संबधीत तांत्रीक कामाची पदवीका, वाहणचालकासाठी वाहण चालवीण्याचा परवाना असणे बंधन कारक असेल.

१९. कंत्राटदारास वरील अटी व शर्ती माण्य असल्यास रू. १००/– च्या स्टॅप पेपरवर करारनामा सादर करणे संबधीत कंत्राटदारास बंधन कारक राहील.

२०. वरील प्रमाणे अटि व शर्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या निवीदा व मसूदा तपशीला नूसार दिनांक १५/०४/२०२५ वेळेपर्यंत कार्यालयीन वेळेत निवीदा सिलबंद लिफाप्यामध्ये सादर करावे.

प्राचार्य,

प्राचार्य
कृषि तंत्र विद्यालय
वरूड (पुसद)